११ पुढारी | पुणे, बुधवार १४ ऑक्टोबर २०१५

# कौशल्य विद्यापीठात योग्य कार्यसंस्कृतीचे प्रशिक्षण द्या

## मुख्यमंत्र्यांचे आवाहन; व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्याची सूचना

### सिम्बॉयसिसकडून विद्यापीठाबाबत आराखडा सादर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात विविध उद्योगांतून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. नव्याने येणाऱ्या उद्योगांसाठी आवश्यक ते व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास विद्यापीठांची आवश्यकता आहे. मात्र ही विद्यापीठे सुरू करताना त्यात योग्य कार्य संस्कृतीचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

राज्यात कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याबाबत पुणे येथील सिम्बॉयसिस या प्रसिद्ध शिक्षण संस्थेतर्फे मंत्रालयात मुख्यमंत्र्यांपुढे सादरीकरण करण्यात आले. मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्रच्या माध्यमातून विविध उद्योगसमूहांकडून राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. या उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी कौशल्य विकास विद्यापीठातून तरुणांना योग्य प्रशिक्षण दिल्यास मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होईल. त्या दृष्टीने आराखडे तयार करून विद्यापीठासाठी नवीन नियमावली तयार करण्याचे आदेश देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्रात सुरू करण्यात येणाऱ्या कौशल्य विद्यापीठाचे दैनंदिन प्रशासन व व्यवस्थापन सिम्बॉयसिस संस्थेतर्फे नियंत्रित करण्यात येईल. तसेच व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून माध्यमिक व उच्च माध्यमिक ते उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध प्रमाणपत्रे, पदविका अभ्यासक्रम , सहपदवी, पदवी, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तसेच व्यावसायिक व उच्च शिक्षण घेणाऱ्यांसाठी अभ्यासक्रम चालविले जाणार असल्याचे सादरीकरणाच्या वेळी सांगण्यात आले. या वेळी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, या विभागाचे प्रधान सचिव एस. एस. संधू, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव संजय चहांदेयांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**सिम्बॉयसिसला हवी ५० एकर जागा**

सिम्बॉयसिस संस्था राज्यामध्ये सार्वजनिक व खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर कौशल्य विकास विद्यापीठाची स्थापना करणार आहे. त्यासाठी ३० ते ५० एकर जमिनीची आवश्यकता आहे. त्यानुसार या विद्यापीठासाठी शासनाने जमीन व इमारत उपलब्ध करून द्यावी आणि या विद्यापीठात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या भागीदार उद्योजकांनी उमेदवारांसाठी यंत्रसामग्री आणि कार्यशाळा यांची उपलब्धता करून देण्याची मागणी सिम्बॉयसिस संस्थेच्या संचालक स्वाती मुजुमदार यांनी सादरीकरणाच्या वेळी केली.

Date:- 15/10/2015



# Symbiosis to soon set up Skill Devp University

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**Pune:** Symbiosis Open Education Society (SOES) will soon set up Skill Development University in Kiwale in Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC) limits. The project has received a nod from Chief Minister Devendra Fadnavis on Tuesday.

Swati Mujumdar, Director of SOES, said that this will be the first Skill Development University in the State. This varsity will offer courses of six months to three-four year duration. The basic qualification requirement will be Secondary School Certification (SSC) to class XII.

Mujumdar said, "Initially, the varsity will offer programmes like Automation, Retails, Construction, Banking which are as per the National Skill Qualification Framework (NSQF) by National Skill Development Corporation (NSDC). These sectors have high growth and are relevant for development. These programmes are slated to commence from June 2016. The syllabus is also being prepared."

The varsity will be set up on Self Financial University Guidelines (SFUG) basis and will be set up on 15 acre land at Kiwale village. The estimated cost of the project is Rs 200 crore. "The infrastructure is being set up, skill centre required for skill development courses will also come up soon. Though the construction cannot be completed till the commencement of academic year, we will complete most of the work to start the courses."

While giving a nod to the project on Tuesday, Fadnavis also asked SOES to give inputs for Model Act for Skill Development University. Mujumdar said, "As per guidelines of Self Finance University, any varsity coming up with these guidelines, will have their own act. During meeting with CM, he asked for suggestions for modification in SFU Guidelines."

She also added that, at present, SFUG does not have any guidelines for Skill Development University. Once this act is formulated by SOES, these will be included in SFU guidelines, which will be useful for new skill development universities in the future.

---

THE TIMES OF INDIA, PUNE
THURSDAY, OCTOBER 15, 2015



# State's maiden skill devpt varsity to come up at Kiwale

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Symbiosis Open Education Society will set up the state's first skill development university at Kiwale, off Pune-Mumbai expressway.

"We have acquired 15 acres land at Kiwale for the university that will go functional from June 2016," the society's principal director Swati Mujumdar told TOI on Wednesday. The society will invest Rs 200 crore in the self-financed project, she said.

On Tuesday, Mujumdar made a presentation on the university before a high-level committee during a meeting at Mantralaya in Mumbai. The meeting was chaired by chief minister Devendra Fadnavis. Ranjit Patil, minister of state in charge of skill development education, and Sanjay Chahande, higher and technical education secretary, were among those present.

"The chief minister has extended his approval to the project. Initially, courses relating to high growth sectors that are relevant to the state, such as automobile, manufacturing and construction, will be offered at the new university," Mujumdar said. A centre of excellence will also be established in collaboration with local industry to train students, she added.

Mujumdar had chaired a multi-member panel appointed by the state government to prepare a roadmap for skill development education in the state and a draft model legislation to regulate the sector. "The CM has called for certain modifications in the model act submitted by the panel and has pushed for promotion of skill development education in a big way," she said.

Symbiosis had earlier submitted a proposal with the state government to set up a self-financed university under the policy adopted by the previous Congress-led government to promote such universities. "We decided to make certain modifications in this proposal to incorporate the skill development dimension," said Mujumdar.

# कौशल्य विकास विद्यापीठास अनुमती

## डॉ. स्वाती मुजुमदार : मेक इन इंडिया संकल्पनेशी निगडित

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) - सिम्बायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी राज्यातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करणार असून, त्यास राज्य शासनाने दोन दिवसांपूर्वी अनुमती दिली आहे, अशी माहिती सिंबायोसिस संस्थेच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार यांनी दिली.

डॉ. मुजुमदार यांनी सांगितले की, मंत्रालयात बुधवारी बैठक झाली. त्यात कौशल्य विकास विद्यापीठाचे सादरीकरण करण्यात आले. त्यास मुख्यमंत्र्यांनी संमती दर्शविली असून, कौशल्य विकास विद्यापीठासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना दिली आहे. कौशल्य विकास ही काळाजी गरज आहे.

### प्रकल्पासाठी २०० कोटींची गुंतवणूक

राज्यातील तरुणांसाठी उद्योग क्षेत्राच्या सहकार्याने एक उत्कृष्ट कौशल्य प्रशिक्षण केंद्र विद्यापीठाच्या कॅम्पसवर स्थापन करण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दतील किवळे येथे १५ एकर जागेमध्ये हे विद्यापीठ विकसित होत आहे. या प्रकल्पामध्ये २०० कोटींची गुंतवणूक करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

**पिंपरी-चिंचवडमधील किवळे येथे प्रकल्प विकसित होणार**

सिम्बायोसिस ओपन आणि कौशल्य विकास विद्यापीठ हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' या संकल्पनेशी निगडित आहे. महाराष्ट्रातील प्रगतीशील व विस्तारणाऱ्या उद्योगधंद्यांना कुशल कामगार वर्गाची तातडीची गरज आहे. राज्यात वेगाने वाढणाऱ्या उद्योगक्षेत्राशी अर्थात ॲटोमोबाईल्स, मॅनिफॅक्चरिंग, कन्स्ट्रक्शन इत्यादी निगडित कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम जून २०१६ पासून सुरू करण्यात येत आहे, असे डॉ. स्वाती मुजुमदार त्यांनी नमूद केले.

# आजचा सकाळ...

17/10/15

## कौशल्य विद्यापीठाच्या प्रस्तावास तत्त्वत मंजुरी

- -

शनिवार, 17 ऑक्टोबर 2015 - 03:30 AM IST

Tags: kaushalya university, proposal, sanction, pune

पुणे - राज्यातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः संमती दिली असून, सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीला त्याचा आराखडा तयार करण्यास नुकतेच सांगितले आहे. दरम्यान, विद्यापीठाचा पहिला टप्पा येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा मानसही संस्थेने व्यक्त केला आहे.

सोसायटीच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार यांनी "सिंबायोसिस ओपन आणि कौशल्य विकास विद्यापीठ' स्थापन करण्याच्या प्रस्तावाचे मुख्यमंत्र्यांना मंत्रालयात नुकतेच सादरीकरण केले. त्या वेळी या बाबतचा आराखडा तयार करण्यास मुख्यमंत्र्यांनी मुजुमदार यांना सांगितले. पिंपरी- चिंवचड महापालिका हद्दीमध्ये किवळे येथील 15 एकर जागेवर हे विद्यापीठ होणार आहे. त्यामध्ये सुमारे 200 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. राज्यातील ऑटोमोबाईल, उत्पादन, बांधकाम आदी विविध क्षेत्रांशी निगडित कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम या विद्यापीठात तयार करण्यात येणार आहेत. त्यातील पहिला टप्पा जून 2016 मध्ये सुरू होणार आहे, अशी माहिती डॉ. मुजुमदार यांनी दिली. बहुविध उद्योग क्षेत्राला कौशल्य असलेले मनुष्यबळ स्थानिकांमधून पुरविण्यासाठी हे विद्यापीठ उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे बेरोजगारी काही प्रमाणात दूर होईल.

सकाळ
रविवार,
१८ ऑक्टोबर २०१५
१४

# कौशल्य विद्यापीठाच्या प्रस्तावास तत्त्वतः मंजुरी

**पुणे, ता. १७ :** राज्यातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः संमती दिली असून, सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीला त्याचा आराखडा तयार करण्यास नुकतेच सांगितले आहे. दरम्यान, विद्यापीठाचा पहिला टप्पा येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा मानसही संस्थेने व्यक्त केला आहे.

सोसायटीच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार यांनी 'सिंबायोसिस ओपन आणि कौशल्य विकास विद्यापीठ' स्थापन करण्याच्या प्रस्तावाचे मुख्यमंत्र्यांना मंत्रालयात नुकतेच सादरीकरण केले. त्या वेळी या बाबतचा आराखडा तयार करण्यास मुख्यमंत्र्यांनी मुजुमदार यांना सांगितले. पिंपरी- चिंचवड महापालिका हद्दीमध्ये किवळे येथील १५ एकर जागेवर हे विद्यापीठ होणार आहे. त्यामध्ये सुमारे २०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. राज्यातील ऑटोमोबाईल, उत्पादन, बांधकाम आदी विविध क्षेत्रांशी निगडित कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम या विद्यापीठात तयार करण्यात येणार आहेत. त्यातील पहिला टप्पा जून २०१६ मध्ये सुरू होणार आहे, अशी माहिती डॉ. मुजुमदार यांनी दिली. मनुष्यबळ निर्मितीसाठी हे विद्यापीठ उपयुक्त ठरणार आहे.

THE TIMES OF INDIA
www.educationtimes.com
Education Times
MONDAY | OCTOBER 19, 2015 | PUNE
Advertorial, Education Promotional F

## NEWSFLASH



Dr Swati Mujumdar, principal director, Symbiosis Open Education Society, gave presentation to the Maharashtra Chief Minsiter Devendra Fadanvis about setting up a skill development university. The CM has hinted at putting a system in place for facilitating such an initiative

FOR EDITORIAL ENQUIRIES, CONTRIBUTIONS AND SUGGESTIONS, CONTACT: **Editor: Diniar B. Patel. Mail:** diniar.patel@ timesgroup.com
**Team Education Times:** Chandrashekhar Welankar, Kanchan Gogate, Sapna Oswal **Mail:** kanchan.gogate@ timesgroup.com

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ मंगळवार, २० ऑक्टोबर २०१५

# 'सिम्बायोसिस'चे कौशल्य विद्यापीठ

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सिम्बायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर किवळे येथे राज्यातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करणार आहे. राज्य सरकारने सोसायटीच्या या विषयीच्या प्रस्तावाला संमती दिली असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून या विद्यापीठाचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

राज्यातील युवा पिढीमध्ये कौशल्यांचा विकास होण्यासाठी आवश्यक बाबींवर विचार करण्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने कौशल्य विकास समिती स्थापन केली होती. सोसायटीच्या प्रधान संचालक डॉ. स्वाती मुजुमदार यांच्याकडे या समितीचे अध्यक्षपद होते. या समितीने आपल्या अहवालामध्ये राज्यात कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याविषयीच्या सूचना केल्या होत्या.

सोसायटीने कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याचा आपला प्रस्तावही राज्य सरकारला सादर केला होता. या प्रस्तावाविषयी गेल्या मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सोसायटीला विद्यापीठाचा आराखडा तयार करण्यास सांगण्यात आल्याची माहिती डॉ. मुजुमदार यांनी दिली. सोसायटीने या विद्यापीठासाठी पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर किवळे परिसरात १५ एकर जागा घेतली असून, सुरुवातीच्या टप्प्यात जवळपास २०० कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. मुजुमदार म्हणाल्या, 'विद्यापीठ स्थापनेबाबतच्या तांत्रिक बाबींची लवकरच पूर्तता होईल. पुढील शैक्षणिक वर्षात या विद्यापीठाचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.'

## 'सेंटर ऑफ एक्सेलन्स'ही उभारणार

सुरुवातीच्या टप्प्यात या विद्यापीठात विद्यार्थ्यांना ऑटोमोबाइल, मॅन्युफॅक्चरिंग, कन्स्ट्रक्शन, रिटेल आदी क्षेत्रांशी निगडित अभ्यासक्रम शिकता येतील. औद्योगिक क्षेत्राच्या नेमक्या गरजा ओळखून त्यानुसार विद्यापीठामध्ये नव्या अभ्यासक्रमांची सुरुवात होईल. औद्योगिक क्षेत्राच्या सहकार्याने चालणारे 'सेंटर ऑफ एक्सेलन्स' आणि तुलनेने मागास समाजघटकांमधील नागरिकांसाठी चालविले जाणारे 'कम्युनिटी कॉलेज' हे या विद्यापीठाचे वैशिष्ट्य ठरणार असल्याचा विश्वासही डॉ. मुजुमदार यांनी व्यक्त केला.